**Anjuman Ishat-E-Taleem**

# Milliya Arts, Science and Management Science College, Beed

## आचारसंहिताः

**०१)** निवडणूकीच्या प्रयोजनार्थ कोणत्याही टप्यावर, कोणत्याही प्रकारचे उमेदवाराचे पॅनल तयार करण्यात येणार नाही.

**०२)** वर्ग प्रतिनिधीच्या निवडणूकीसाठी प्रत्येक उमेदवारामागे जास्तीत जास्त रूपये १,००० आणि अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी यांच्या निवडणूकीसाठी प्रत्येक उमेदवारामाग्र जास्तीत जास्त ५,००० इतका खर्च अनुज्ञेय असेल.

**०३)** प्रत्येक उमेदवारास निकाल घोषित झाल्यापासून दोन आडवड्याच्या आत, अनुक्रमांने क्रमांक दिलेल्या प्रमाणकांच्या स्वसाक्षांकित प्रतीसह, या आदेशासोबत जोडलेल्या नमुना 'ब' मधील खर्चाचे स्वसाक्षकिंत विवरणपत्र निवडणूक अधिका-याकडे सादर करावे लागेल.

०४) कोणत्याही उमेदवार निवडणूक मोहिमेदरम्यान कोणताही धर्म किंवा जात किंवा सामाजिक संघटना किंवा व्याक्ती यरसह कोइत्याही राजकीय पक्षाचे, इतर संघटनेचे व इतर कोणत्याही व्यक्तीचे चिन्हकिंवा बोधचिन्ह किंवा छायाचित्र किंवा प्रतिमा यांचा वापर करणार नाही.

०५) कोणत्याही उमेदवारास निवडणूक मोहिमेदरम्यान महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आवारात मिरवणूक काढण्यास किंवा मेळावा घेण्यास परवानगी असणार नाही.

०६) मतदानाच्य दिवशी त्या महाविद्यालयाच्याकिंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या वैध ओळखपत्राशिवाय त्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्याकिंवा विद्यापीठाच्या आवारात प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल.

०७) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आवारात निवडणूक मोहिमेच्या प्रयोजनार्थ जनतेस संबोधणारी यंत्रणा आणि वाहणे आणि इतर कोणतीही वाहतुकिची साधने याच्य वापरास सक्त मनाई असेल.

०९) कोणताही उमेदवार ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या गटांमधील मतभेद विकोपास जातील किंवा परस्पर द्वेष, शत्रुत्व आणि तणाव निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही किंवा त्यात सहभागी होणार नाही.

१०) उमेदवार किंवा त्याचा समर्थक महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा विद्यापीठ यांची मालमत्ता, जी कोणतीही पध्दत असेल त्या पध्दतीने विरूपित करणार नाही किंवा ती नष्ट करण्याची व्यवस्था करणार नाही.

११) निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये, महाद्यिालयाच्या किंवा परिसंस्थे्च्या किंवा विद्यापीठाच्या आवारात आणि मतदान केद्रामध्ये कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस प्रवेश करण्यास काटेकोरपणे मनाई करण्यात येईल.

१२) प्रत्येक उमेदवार, निवडणूक प्रक्रियेदरम्यान महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या परिसरात शांतता व सलोखा राखण्याकरीता प्रधिकरणाला स्वयंप्रेरणेने मदत आणि सहाय्य करील.

१३) कोणत्याही उमेदवाराकडून आचारसंहितेच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लघन झाल्यास, निवडणूक अधिकारी, त्या उमेदवारावर उचित शिस्तभंगाची कार्यवाही करेल. त्याच बरोबर त्याची उमेदवारी रद्द करील. या प्रक्रियेत अंतिम निर्णय घंण्यापूर्वी, व्यथित व्यक्तीस, आपले म्हणणे मांडण्याची योग्य संधी देण्यात येईल.

१४) 'निवडणूीशी संबंधित अपराध' या संबंधातील भारतीय दंड संहितेच्या तरतुदी ह्या विद्यार्थी निवडणूकीकरिता लागू असतील.आक्षेपार्ह घटना या कथित अपराध घडल्यानंतर, प्रकरण नोंदविण्यासाठी बारा तासाच्या आत पोलिसांना कळविण्यात याव्यात.

१५) निवडणूक पगक्रियेदरम्यान महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा विद्यापीठ यांचे सर्व अध्यापक व आाध्यापनेतर कर्मचारी यांनी निवडणूक अधिका-याने नेमून दिलेले कोणतेही काम, जबाबदारी पार पाडणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

निवडणूक अधि-याची सही.